Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। सोमवार, दि. १७ ऑगस्ट २०२६ । वर्ष १ । अंक १२९ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306
DIGITAL EDITION



स्वातंत्र्यदिनी पी. डी. पाटील व एम. बी. मोरे यांना 'उत्कृष्टबीएलओ' पुरस्कार

(पान २ वर)

## पवित्र पोर्टल शिक्षक भरतीचा अंतिम टप्पा; ५ सप्टेंबरपूर्वी ३० हजार उमेदवारांना नियुक्ती देण्याची मागणी

# पवित्र पोर्टल शिक्षक भरती अंतिम टप्प्यात!

### अंतिम निवड यादीकडे हजारो उमेदवारांचे लक्ष – शिक्षक दिनापूर्वी नियुक्तीपत्रे देण्याची कृती समितीची आग्रही मागणी

**जन सम्राट टाईम्स**

**नागपूर | महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागांतर्गत सुरू असलेल्या 'पवित्र पोर्टल' शिक्षक भरती २०२५-२६ प्रक्रियेने आता निर्णायक टप्पा गाठला आहे. पोर्टलवरील प्रक्रियेनुसार हजारो पात्र उमेदवारांनी आपले पसंतीक्रम (PREFERENCES) यशस्वीरित्या लॉक केले असून, आता सर्वांचे लक्ष अंतिम निवड यादीकडे लागले आहे.**

५ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शिक्षक दिनापूर्वी राज्यातील सुमारे ३० हजार पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यात यावी, अशी आग्रही मागणी 'कृती समिती महाराष्ट्र राज्य'ने केली आहे.

**पसंतीक्रम लॉक; नियुक्तीची प्रतीक्षा**

शिक्षक भरती प्रक्रियेत सहभागी झालेल्या उमेदवारांसाठी पसंतीक्रम लॉक करण्याचा टप्पा महत्त्वाचा मानला जातो. अनेक महिन्यांपासून भरती प्रक्रियेच्या प्रतीक्षेत असलेल्या डी.टी.एड. आणि बी.एड. धारक उमेदवारांनी हा टप्पा पूर्ण केल्यानंतर आता अंतिम निवड व नियुक्तीची उत्सुकता वाढली आहे.

कृती समितीच्या वतीने सर्व उमेदवारांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या असून, प्रक्रिया अधिक वेगाने पूर्ण करण्याची मागणी शिक्षण विभागाकडे करण्यात आली आहे.




**संघटना, मार्गदर्शकांचे योगदान अधोरेखित**

शिक्षक भरतीमध्ये अधिकाधिक जागा उपलब्ध व्हाव्यात आणि उमेदवारांना न्याय मिळावा यासाठी विविध संघटना, मार्गदर्शक आणि कार्यकर्त्यांनी प्रयत्न केल्याचे समितीने म्हटले आहे. यामध्ये अब्दुल गनी सर (AGS अकॅडमी), तुषार देशमुख सर (युवा असोसिएशन) आणि महेश देवळे सर (गुरुजन चॅनेल) यांच्यासह इतर संघटना व मार्गदर्शकांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे समितीने नमूद केले. भरती प्रक्रिया गतिमान ठेवण्यासाठी शिक्षण परिषदेतील वरिष्ठ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या परिश्रमांचेही समितीने आभार मानले आहेत. तसेच, काही संघटनांच्या कार्यपद्धतीवर टीका करताना त्यांनी उमेदवारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण केल्याचा आरोपही समितीने केला आहे.

**५ सप्टेंबरपूर्वी नियुक्तीपत्रांची मागणी**

शिक्षक दिनाचे औचित्य साधून ५ सप्टेंबरपूर्वी अंतिम निवड यादी जाहीर करून सुमारे ३० हजार उमेदवारांच्या हाती नियुक्तीपत्रे देण्यात यावीत, अशी मागणी कृती समितीने केली आहे. यामुळे अनेक महिन्यांपासून रोजगाराच्या प्रतीक्षेत असलेल्या उमेदवारांच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळेल, अशी भूमिका समितीने मांडली.

**"३० हजार कुटुंबांत रोजगाराचा प्रकाश पडावा"**

कृती समिती महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष एस. एम. नागपुरे यांनी सांगितले की, उमेदवारांनी अत्यंत संयमाने भरती प्रक्रिया पूर्ण केली आहे. आता शिक्षण परिषदेने विलंब न करता अंतिम याद्या जाहीर कराव्यात आणि ५ सप्टेंबरपूर्वी ३० हजार बेरोजगार तरुणांच्या कुटुंबात रोजगाराचा प्रकाश पडावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. समितीचे सदस्य चंद्रकांत महाजन यांनी गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या संघर्षाचा उल्लेख करत कागदपत्रे व याद्यांची पुढील प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याची मागणी केली. तर सदस्य रामकृष्ण मरगळे यांनी पसंतीक्रम लॉक झाल्याने एक महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला असला तरी ३० हजार उमेदवारांना प्रत्यक्ष नियुक्ती मिळेपर्यंत समितीचा लढा सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट केले. दरम्यान, अंतिम निवड यादी कधी जाहीर होते आणि नियुक्तीपत्रांचे वितरण कोणत्या कालमर्यादेत केले जाते, याकडे आता राज्यभरातील शिक्षक पदाच्या उमेदवारांचे लक्ष लागले आहे.

---

**Selected**

### १५ दिवसांआड दूषित पाणीपुरवठा;

**जळगाव :** कुसुंबा येथे पाणीपुरवठ्याचा प्रश्न गंभीर बनला असून, तब्बल १५ दिवसांच्या अंतराने पाणीपुरवठा होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यातही मिळणारे पाणी दूषित असल्याने संतप्त झालेल्या महिलांनी १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनी अजिंठा महामार्गावर रास्तारोको आंदोलन केले. अचानक झालेल्या आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली आणि दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या कुसुंबा ग्रामपंचायतीकडून नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांना मोठ्या पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. १५ दिवसांनी एकदा पाणी मिळत असल्याने दैनंदिन गरजा भागविण्यासाठी नागरिकांना मोठी कसरत करावी लागत असल्याचे आंदोलनकर्त्या महिलांनी सांगितले.

---

## पीएम श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाल येथे स्वातंत्र्यदिन

### साक्षरता व तंबाखूमुक्तीची शपथ; विद्यार्थ्यांचा गौरव आणि शालेय बँडसह प्रभातफेरीने वाढविला उत्साह

**जन सम्राट टाईम्स**

**पाल | (प्रतिनिधी):** पीएम श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पाल येथे १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिन उत्साहपूर्ण आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. नंदकिशोर चव्हाण यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.ध्वजारोहणानंतर उपस्थित विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थांनी साक्षरता आणि तंबाखूमुक्तीची शपथ घेतली. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, शिक्षणाचे महत्त्व आणि निरोगी जीवनशैलीबाबत जागृती निर्माण करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने विविध शालेय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा तसेच मागील शैक्षणिक वर्षात आपापल्या वर्गात प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचा बक्षीस देऊन गौरव करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांच्या या सत्कारामुळे इतर विद्यार्थ्यांनाही शैक्षणिक आणि विविध उपक्रमांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्याची प्रेरणा मिळाली.



महापुरुषांच्या वेशभूषेने वेधले लक्ष

स्वातंत्र्यदिनानिमित्त विद्यार्थ्यांनी थोर नेते व महापुरुषांच्या वेशभूषा परिधान करून कार्यक्रमात सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या आकर्षक वेशभूषेने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. यानंतर शाळेच्या बँड पथकाच्या सहभागाने गावातून प्रभातफेरी काढण्यात आली. हातात तिरंगा आणि देशभक्तीचा उत्साह घेऊन विद्यार्थ्यांनी गावातील वातावरण देशप्रेमाने भारून टाकले. प्रभातफेरीनंतर विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. ग्रामस्थांची उत्स्फूर्त उपस्थिती कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, पालक तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## माळीवाडा जिल्हा परिषद शाळेच्या प्रश्नांवर युवक काँग्रेस आक्रमक!

**जन सम्राट टाईम्स**

**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी:** माळीवाडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विविध प्रलंबित समस्या आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधांबाबत युवक काँग्रेसचे माजी सरचिटणीस मयुर साठे यांनी पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. शाळेच्या विकासासाठी तातडीने आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. माळीवाडा जिल्हा परिषद शाळेची विद्यमान इमारत जीर्ण झाल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा विचार करून नवीन व सुसज्ज शालेय इमारत उभारण्यात यावी, अशी प्रमुख मागणी मयुर साठे यांनी केली. ८ वी ते १२ वीपर्यंतचे वर्ग सुरू करण्याची मागणी सध्या माळीवाडा जिल्हा परिषद शाळेत इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतचे वर्ग सुरू आहेत. सातवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी इतर ठिकाणी जावे लागते. त्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी शाळेत इयत्ता आठवी ते बारावीपर्यंतचे उच्च माध्यमिक वर्ग सुरू करावेत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली.

---

### जुन्या वादातून १९ वर्षीय तरुणाचा चाकूने खून

**मुक्ताईनगर | प्रतिनिधी :** मुक्ताईनगर तालुक्यातील बेलसवाडी येथे जुन्या वादातून १९ वर्षीय तरुणावर चाकूने हल्ला करून त्याचा खून केल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी रात्री घडली. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून, प्रकरणी मुक्ताईनगर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेतील संशयित १७ वर्षीय अल्पवयीन मुलास पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

मृत तरुणाचे नाव अबुजर रफीक शेखअसे आहे. शुक्रवारी रात्री सुमारे ८.४५ वाजता अबुजर हा गावातील साबीर खान मेंबर यांच्या नवीन बांधकाम सुरू असलेल्या प्लॉटवर उपस्थित होता.

---

## सापवाचविण्याचासंदेशदेण्यासाठीचव्हिडिओ

### सर्पमित्रांनी सापाला जंगलात सोडले' : रोहिणी खडसे

**जन सम्राट टाईम्स**

**मुक्ताईनगर| प्रतिनिधी :** धामण साप पकडल्याच्या व्हिडिओवरून नगरसेवक प्रशांत टोंगे यांनी वनविभागाकडे केलेल्या तक्रारीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) च्या महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. सापांना वाचविणे, नागरिकांना विषारी व बिनविषारी सापांबाबत माहिती देणे आणि सर्पसंवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविणे, हाच व्हिडिओ करण्यामागील उद्देश होता, असे खडसे यांनी म्हटले आहे. खडसे यांनी सांगितले की, सापांची संख्या दिवसेंदिवस कमी होत असून नागरिकांमध्ये विविध सापांच्या प्रजातींबाबत पुरेशी माहिती नाही. कोणता साप विषारी आणि कोणता बिनविषारी, याबाबत जनजागृती होणे गरजेचे आहे. त्यामुळे लोकांनी सापांना घाबरून त्यांना मारण्याऐवजी त्यांचे संवर्धन करावे, या उद्देशाने व्हिडिओच्या माध्यमातून जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात आला. 'सर्पमित्र नरेंद्र कोळी आमच्यासोबत होते' संबंधित साप पकडताना सर्पमित्र नरेंद्र कोळी हे सोबत असल्याचे रोहिणी खडसे यांनी स्पष्ट केले. नरेंद्र कोळी यांनीच साप पकडला आणि त्यानंतर त्याला जंगलात सुरक्षितपणे सोडून देण्यात आले, असा दावा त्यांनी केला. सापाला इजा करणे किंवा त्याला कोणत्याही प्रकारची हानी पोहोचविणे हा आपला उद्देश नव्हता, असे सांगत खडसे म्हणाल्या की, निसर्गाच्या साखळीत सापांचे महत्त्व मोठे आहे. साप जिवंत राहणे हे पर्यावरणाबरोबरच शेतकऱ्यांसाठीही फायदेशीर आहे. त्यामुळे सर्पसंवर्धनासाठी समाजात जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न आपण केला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तक्रारदार प्रशांत टोंगे यांच्या भूमिकेवर भाष्य करताना रोहिणी खडसे यांनी राजकीय संदर्भही उपस्थित केला. "तक्रारदार कदाचित विसरले असतील की, त्यांच्या नेत्यांनी बेशुद्ध अवस्थेतील बिबट्याला मारहाण केली होती.

---

**जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज**

## रोहिणी खडसेंविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी

### नगरसेवक प्रशांत टोंगे यांची वनमंत्री व वनविभागाकडे तक्रार

**जन सम्राट टाईम्स**


**मुक्ताईनगर | प्रतिनिधी:** मुक्ताईनगर येथील शेतातून जिवंत धामण साप हाताने पकडल्याचा कथित व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित झाल्यानंतर या प्रकरणाला आता कायदेशीर वादाचे स्वरूप आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) च्या महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी एकनाथ खडसे यांच्या सोशल मीडिया खात्यांवर १२ ऑगस्ट रोजी प्रसारित झालेल्या कथित व्हिडिओप्रकरणी मुक्ताईनगर नगरपंचायतीचे नगरसेवक प्रशांत अशोक टोंगे यांनी महाराष्ट्राचे वनमंत्री गणेश नाईक, वनविभाग तसेच पोलीस प्रशासनाकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. संबंधित प्रकरणाची तातडीने चौकशी करून लागू कायद्यांनुसार गुन्हा



दाखल करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. तक्रारीनुसार, संबंधित व्हिडिओमध्ये रोहिणी खडसे एका मोठ्या जिवंत धामण सापाला हाताने पकडताना दिसत असल्याचा दावा करण्यात आला आहे.

साप हाताळताना सुरक्षित व वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करण्यात आला नसल्याचे तसेच सापाच्या मानेजवळ किंवा शरीरावर कथितपणे जोराचा दबाव टाकण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे सापाला इजा अथवा वेदना झाल्या असण्याची शक्यता असून, या संपूर्ण प्रकाराची वस्तुनिष्ठ चौकशी करावी, अशी मागणी टोंगे यांनी केली आहे. सापाला नैसर्गिक अधिवासात सोडले का? व्हिडिओ प्रसारित झाल्यानंतर संबंधित सापाचे पुढे काय झाले, हा महत्त्वाचा प्रश्न असल्याचे तक्रारदाराने म्हटले आहे. सापाला सुरक्षितपणे नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले की नाही, तो सध्या जिवंत आहे का आणि त्याला कोणतीही इजा झाली आहे का, याची वनविभागाने खातरजमा करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. सापाला सोडल्याबाबत वनविभागाकडे कोणती अधिकृत नोंद किंवा पुरावा आहे का, याचीही तपासणी करण्याची मागणी तक्रारीत करण्यात आली आहे. त्यामुळे केवळ व्हिडिओच्या आधारे निष्कर्ष न काढता संपूर्ण घटनाक्रमाची चौकशी करण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे. वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार कारवाईची मागणी जिवंत वन्यजीवाला विनापरवानगी पकडणे, त्याला इजा करणे अथवा अनुचित पद्धतीने हाताळणे यासंदर्भात लागू असलेल्या कायदेशीर तरतुदीनुसार कारवाई करावी, अशी मागणी प्रशांत टोंगे यांनी केली आहे.

वंचितांचा, शोषितांचा निर्भीड आवाज
दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल...
डिजिटल युगात वेगवान, निर्भीड आणि सत्याला प्राधान्य देणारे दैनिक जन सम्राट टाईम्स!
तुम्हालाही पत्रकारितेची आवड आहे का?
समाजातील प्रश्न मांडण्याची जिद्द आहे का?
तुमच्या परिसरातील बातम्या जगापर्यंत पोहोचवायच्या आहेत का?
मग हीच तुमच्यासाठी सुवर्णसंधी!
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका आणि गावासाठी वार्ताहर / प्रतिनिधी पाहिजेत
अनुभव असो वा नसो
– उत्साह आणि प्रामाणिकपणा महत्त्वाचा
डिजिटल पत्रकारितेचे प्रशिक्षण व मार्गदर्शन उपलब्ध
तुमच्या आवाजाला मिळेल राज्यभर व्यासपीठ
संपर्क करा (Call / WhatsApp)
+91 93254 87889 / 9270187889
- संपादक -
मुकुंदराव शामराव नंन्नवरे
ईमेल : Jansamrattimes@gmail.com -
वेबसाईट : https://jansamrattimes.in
आजच संपर्क करा...
तुमचा आवाज बना जनतेचा आवाज!



# पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण संपन्न!

## उमेद अभियानातील कथित गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी आंदोलन

जन सम्राट टाईम्स

**धुळे। प्रतिनिधी:** स्वातंत्र्यदिनानिमित्त धुळे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते सकाळी ९ वाजून ५ मिनिटांनी मुख्य शासकीय ध्वजारोहण उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. ध्वजारोहणानंतर पालकमंत्र्यांनी उपस्थितांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा देत जिल्ह्यात सुरू असलेल्या तसेच पूर्ण झालेल्या विविध विकासकामांची माहिती दिली. यावेळी उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आल्याने कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. उमेद अभियानातील कथित गैरव्यवहाराविरोधात आंदोलकांचा आत्मदहनाचा प्रयत्न दरम्यान, उमेद अभियानातील कथित गैरव्यवहाराच्या आरोपांवरून कारवाईच्या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या आंदोलकांनी आत्मदहनाचा प्रयत्न केल्याची घटना घडली. मात्र, पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून हा प्रयत्न हाणून पाडल्याने मोठा अनर्थ टळला. उमेद अभियानातील कथित गैरव्यवहाराची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी बचत गटांच्या महिला व सामाजिक कार्यकर्त्यांकडून



आंदोलन सुरू आहे.

स्वातंत्र्यदिनाच्या मुख्य कार्यक्रमादरम्यान घडलेल्या या प्रकारामुळे काही काळ परिसरात खळबळ उडाली. शासकीय कार्यालयांमध्येही उत्साहात ध्वजारोहण स्वातंत्र्यदिनानिमित्त सकाळपासूनच धुळे शहरातील विविध शासकीय कार्यालयांमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात ध्वजारोहण करण्यात आले. माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यासह विविध शासकीय कार्यालयांमध्ये राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. त्यानंतर विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत आयोजित मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमात सहभागी झाले. मान्यवरांची उपस्थिती मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमास पालकमंत्री जयकुमार रावल, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, मनपा आयुक्त नितीन कापडणीस, जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, आमदार अनुप अग्रवाल, राम भदाणे, मंजुळा गावित, महापौर मायादेवी परदेशी, उपमहापौर ज्योत्स्ना पाटील, सभापती लताबाई पोतदार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता विनोद भदाणे, माध्यमिक शिक्षणाधिकारी मनीष पवार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वातंत्र्यदिनाचा मुख्य शासकीय सोहळा एका बाजूला उत्साहात पार पडत असतानाच आंदोलकांच्या आत्मदहनाच्या प्रयत्नामुळे प्रशासन आणि पोलिसांची सतर्कता पुन्हा एकदा चर्चेत आली आहे.

# सारोळा शाळेतील ५९ गुणवंत विद्यार्थ्यांचा स्वातंत्र्यदिनी गौरव

जन सम्राट टाईम्स

**जामखेड | प्रतिनिधी:** "गुणवंत विद्यार्थी हेच भारताचे उज्ज्वल भविष्य आहे," या उद्देशाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सारोळा येथील माजी विद्यार्थी संघाचे उपाध्यक्ष तथा उद्योजक भीमराव गोविंदराव सांगळे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांच्या प्रोत्साहनासाठी ११ हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये इयत्ता चौथी, पाचवी, सातवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षा तसेच NMMS परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या तब्बल ५९ गुणवंत विद्यार्थ्यांचा स्वातंत्र्यदिनाच्या मुहूर्तावर गौरव करण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीला प्रोत्साहन देणारा हा उपक्रम प्रेरणादायी ठरत आहे. दरवर्षी गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन भीमराव सांगळे यांच्या वतीने दरवर्षी स्वातंत्र्यदिनानिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांसाठी ११ हजार रुपयांचे बक्षीस दिले जाते. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच शाळेच्या सर्वांगीण विकासासाठीही त्यांनी सातत्याने योगदान दिले आहे. गुरुपौर्णिमेनिमित्त त्यांनी यापूर्वी शाळेसाठी १ लाख २ हजार ६०१ रुपयांची देणगी देऊन सामाजिक बांधिलकी जपली आहे. विद्यार्थ्यांना मिळणार प्रेरणा सारोळा शाळेच्या शैक्षणिक व भौतिक विकासासाठी सातत्याने मदतीचा हात देणाऱ्या सांगळे यांच्या दातृत्वाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. त्यांच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये अधिक मेहनत घेऊन शैक्षणिक यश संपादन करण्याची प्रेरणा निर्माण होत आहे. या दातृत्वाबद्दल सरपंच रितूताई काशीद, अजयदादा काशीद, उपसरपंच हर्षद मुळे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सतीश मुळे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर जगदाळे, ग्रेड मुख्याध्यापक संदीप भालसिंग, सर्व शिक्षक, पालक, ग्रामस्थ व विद्यार्थी यांच्या वतीने भीमराव सांगळे यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

# आधुनिक शेतीचा विद्यार्थ्यांना धडा!



जन सम्राट टाईम्स

**बोरगाव। प्रतिनिधी:** स्पर्श फाउंडेशन, जळगाव संचलित सर्वज्ञ माध्यमिक विद्यालय, बोरगाव बुद्रुक येथे दि. १३ ऑगस्ट २०२६ रोजी महिको कंपनीचे जनक तथा पद्मभूषण डॉ. बद्रीनारायण आर. बारवाले यांच्या ९५व्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना महिको कंपनीच्या प्रगतीचा आढावा देतानाच विविध प्रकारच्या बियाण्यांविषयी, आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि कृषी क्षेत्रातील बदलांविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. शेती क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, दर्जेदार बियाण्यांचे महत्त्व तसेच बदलत्या काळानुसार शेतकऱ्यांनी आधुनिक पद्धतींचा अवलंब करण्याची गरज याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमासाठी श्री. नवनाथ भोंडवे (आरबीएम) आणि श्री. प्रवीण नागरे (टीएसएम) यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

त्यांना श्री. मिलिंद पाटील (अमळनेर) आणि श्री. शुभम पाटील (धरणगाव) यांचे मोलाचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांना भेटवस्तूंचे वाटप कार्यक्रमाच्या निमित्ताने उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना कंपनीच्या वतीने प्रत्येकी एक वही आणि की-चेन भेट म्हणून देण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये कृषीविषयक ज्ञानाची आवड निर्माण होण्यास तसेच आधुनिक शेतीविषयी प्राथमिक माहिती मिळण्यास मदत झाली. कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांचे स्वागत विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. एस. एच. महानुभाव यांनी केले. त्यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील उद्देश स्पष्ट करत विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच शेती आणि कृषी क्षेत्रातील आधुनिक बदलांची माहिती मिळणे आवश्यक असल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेत सहकार्य केले. मार्गदर्शकांचे आभार मानत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

कृषीविषयक ज्ञानाची विद्यार्थ्यांना पर्वणी पद्मभूषण डॉ. बद्रीनारायण आर. बारवाले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांना आधुनिक शेती, बियाणे तंत्रज्ञान आणि कृषी क्षेत्रातील प्रगतीची माहिती मिळाली. शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना कृषी क्षेत्राशी जोडणारा हा उपक्रम विद्यालयात उत्साहात पार पडला.

# स्वातंत्र्यदिनी पी. डी. पाटील व एम. बी. मोरे यांना 'उत्कृष्ट बीएलओ' पुरस्कार

## धरणगाव नगरपरिषदेत ८०वा स्वातंत्र्यदिन उत्साहात

जन सम्राट टाईम्स



**धरणगाव | प्रतिनिधी:** धरणगाव नगरपरिषदेत भारताचा ८०वा स्वातंत्र्यदिन उत्साहपूर्ण आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. कुळवाडी भूषण छत्रपती शिवराय स्मारकासमोरील तिरंगा चौकात नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रोशनसिंग राजपूत यांच्या हस्ते पूजन करण्यात आले, तर नगराध्यक्षा लीलाबाई सुरेश चौधरी यांच्या शुभहस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर राष्ट्रगीत, वंदे मातरम् आणि महाराष्ट्र गीताचे सामूहिक गायन करण्यात आले. स्वातंत्र्यदिनाच्या या सोहळ्यात धरणगाव शहरातील सहा मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना (BLO) उत्कृष्ट बीएलओ पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यामध्ये महात्मा फुले हायस्कूलचे उपशिक्षक तथा यादी भाग क्रमांक १९९ चे बीएलओ पी. डी. पाटील आणि यादी भाग क्रमांक १९५ चे बीएलओ एम. बी. मोरे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. नगराध्यक्षा लीलाबाई चौधरी आणि मुख्याधिकारी रोशन राजपूत यांच्या हस्ते दोघांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. एसआयआरचे काम वेळेआधी पूर्ण धरणगाव शहरातील मोठा माळीवाडा परिसरातील भारत निवडणूक आयोगाच्या एसआयआर (विशेष सघन पुनरीक्षण) मतदार पुनरिक्षण कार्यक्रमात पी. डी. पाटील यांनी शहरात प्रथम क्रमांकाने आणि निर्धारित वेळेपूर्वी काम पूर्ण केले. मतदार याद्या अद्ययावत ठेवणे, फॉर्म क्रमांक ६, ७ व ८ वेळोवेळी भरणे तसेच वर्षभर मतदार जनजागृती करण्याच्या त्यांच्या कार्याची दखल घेऊन नगरपरिषदेकडून प्रथमच त्यांना 'उत्कृष्ट बीएलओ' पुरस्कार देण्यात आला. मुख्याधिकारी रोशन राजपूत यांनी पी. डी. पाटील यांच्या कार्याचे कौतुक करताना, एसआयआरचे काम शहरात प्रथम क्रमांकाने पूर्ण करण्यामागे त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे महत्त्व असल्याचे सांगितले. यापूर्वीही तीन वेळा आदर्श बीएलओ पुरस्कार पी. डी. पाटील यांना यापूर्वीही तहसील कार्यालय, धरणगाव यांच्या माध्यमातून तीन वेळा आदर्श बीएलओ पुरस्कार मिळाला आहे. तहसीलदार नितीनकुमार देवरे आणि तहसीलदार महेंद्र सूर्यवंशी यांच्या हस्ते त्यांचा यापूर्वी गौरव करण्यात आला होता. नगरपरिषदेने आपल्या कार्याची दखल घेऊन स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी सन्मान केल्याबद्दल पी. डी. पाटील यांनी आभार व्यक्त केले.

# काहुरखेडे जि. प. शाळेत देशभक्तीचा जागर; ३८ विद्यार्थ्यांचा वक्तृत्व स्पर्धेत उत्स्फूर्त

## लेझीम व डंबेल्स कवायतीने रंगला स्वातंत्र्यदिन

जन सम्राट टाईम्स

**काहुरखेडे | प्रतिनिधी:** स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून काहुरखेडे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विविध देशभक्तीपर तसेच सामाजिक जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. वक्तृत्व स्पर्धा, देशभक्तीपर नृत्य, लेझीम आणि डंबेल्स कवायत संचलनाने संपूर्ण कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. शाळेतील एकूण ६५ विद्यार्थ्यांपैकी तब्बल ३८ विद्यार्थ्यांनी वक्तृत्व स्पर्धेत सहभाग घेतला. यामध्ये इयत्ता पहिली ते पाचवीतील सहा विद्यार्थ्यांनी इंग्रजीत, दोन विद्यार्थ्यांनी हिंदीत, तर ३० विद्यार्थ्यांनी मराठीत देशभक्तीपर भाषणे सादर केली. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने केलेल्या भाषणातून राष्ट्रप्रेम, स्वातंत्र्याचे महत्त्व आणि देशाप्रती असलेली कर्तव्यभावना प्रभावीपणे व्यक्त केली. योगेश पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण भारतीय सैन्यदलात सेवेत असलेले योगेश प्रल्हाद पाटील यांच्या हस्ते शाळेच्या प्रांगणात राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात



आले. ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीताने वातावरण भारावून गेले. यावेळी योगेश पाटील यांनी शाळेतील सर्व ६५ विद्यार्थ्यांना लेखनासाठी पॅड व बिस्किटांचे वाटप केले. विद्यार्थ्यांना देशसेवा, शिस्त, प्रामाणिकपणा आणि राष्ट्रप्रेमाचे महत्त्व सांगत त्यांनी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. लेझीम व डंबेल्स कवायतीने वेधले लक्ष विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर आधारित लेझीम व डंबेल्स कवायत संचलन सादर केले. शिस्तबद्ध हालचाली आणि उत्स्फूर्त सादरीकरणामुळे उपस्थितांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यासोबतच विद्यार्थ्यांनी दोन देशभक्तीपर गीतांवर सामूहिक नृत्य सादर केले. सहा विद्यार्थिनींनी वैयक्तिकरित्या देशभक्तीपर गीतांवर नृत्य सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली. तंबाखूमुक्ती आणि साक्षरतेची शपथ स्वातंत्र्यदिनानिमित्त विद्यार्थ्यांसह उपस्थित ग्रामस्थांनी तंबाखूमुक्त अभियानाची शपथ घेतली. तंबाखू आणि विविध व्यसनांपासून दूर राहून निरोगी समाज निर्माण करण्याचा संकल्प करण्यात आला. तसेच, 'सर्व असाक्षर व्यक्तींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी १०० टक्के योगदान देऊन महाराष्ट्र साक्षर महाराष्ट्र बनवू' या संकल्पनेतून उपस्थितांनी साक्षरता अभियानाची शपथ घेतली. समाजातील प्रत्येक व्यक्ती साक्षर होण्यासाठी योगदान देण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. शपथविधीनंतर विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. 'देशप्रेम कृतीतून व्यक्त झाले पाहिजे' यावेळी मार्गदर्शन करताना मान्यवरांनी स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागामुळे देशाला स्वातंत्र्य मिळाल्याचे सांगत आजच्या पिढीने शिक्षण, शिस्त, प्रामाणिकपणा आणि सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून देशाच्या प्रगतीत योगदान द्यावे, असे आवाहन केले. 'देशप्रेम केवळ घोषणा देण्यात नसून आपल्या दैनंदिन कृतीतून ते दिसले पाहिजे.


# रंगले जयकिरण प्रभाजी न्यू इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांसह तंबाखूमुक्ती व कॉपीमुक्तीची शपथ

जन सम्राट टाईम्स

**प्रतिनिधी:** डियम स्कूलमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ अंतर्गत देशाचा ८०वा स्वातंत्र्यदिन अत्यंत उत्साहपूर्ण, देशभक्तीमय आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण शाळा परिसरात राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण झाली. कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे सचिव जीवन जैन यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करून करण्यात आली. ध्वजारोहणानंतर वंदे मातरम्, राष्ट्रगीत आणि महाराष्ट्र गीताचे सामूहिक गायन करण्यात आले. उपस्थितांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाचे स्मरण केले. तंबाखूमुक्ती व कॉपीमुक्तीची शपथ स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसह उपस्थितांनी तंबाखूमुक्तीची शपथ घेतली. तसेच परीक्षेत कोणत्याही गैरप्रकाराचा अवलंब न करता प्रामाणिकपणे परीक्षा देण्याची कॉपीमुक्तीची शपथ विद्यार्थ्यांना देण्यात आली. निरोगी जीवनशैली, प्रामाणिकपणा आणि जबाबदार नागरिकत्वाचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. देशभक्तीपर कार्यक्रमांनी परिसर दुमदुमला विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना जागृत करण्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. स्वातंत्र्यदिनाचे महत्त्व विशद करणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी विद्यार्थ्यांनी 'भारत माता की जय' आणि 'वंदे मातरम्' अशा जयघोषांनी शाळेचा परिसर दुमदुमून टाकला. विद्यार्थ्यांच्या उत्साहामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

# कै. व्ही. एन. पाटील विद्यालयात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

## गटलू बागले यांच्या हस्ते ध्वजारोहण



जन सम्राट टाईम्स

**चौगाव। प्रतिनिधी:** न्यू एज्युकेशन सोसायटी, आर्वी संचलित कै. व्ही. एन. पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, चौगाव येथे स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहणाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि देशभक्तीमय वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावातील प्रतिष्ठित नागरिक आबासो रवींद्र उत्तम शिरसाठ होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वातंत्र्यदेवीचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. श्री. रामकृष्ण दामू पाटील, माजी सरपंच श्री. अभिमन्यू दामू बागले, स्कूल कमिटी चेअरमन श्री. नानासाहेब प्रभाकर वेडू मासुळे, सहसचिव श्री. प्रमोद भाऊ वागले, विद्यालयाचे प्राचार्य श्री. आर. एल. बोराळकर आणि पर्यवेक्षक श्री. के. पी. पदमर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यानंतर विद्यालयाचे सेवानिवृत्त उपशिक्षक श्री. भगवान गटलू बागले यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रध्वज फडकताच विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत सादर करून तिरंग्याला मानवंदना दिली. मान्यवरांची उपस्थिती कार्यक्रमास गावातील प्रतिष्ठित नागरिकांसह ग्रामपंचायतीच्या प्रशासक श्रीमती लीलाताई सिताराम बागले व त्यांचे प्रशासकीय मंडळ, विविध संस्थांचे पदाधिकारी, अधिकारी, तरुण बांधव, पालक, विद्यार्थी तसेच विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सांस्कृतिक कार्यक्रमांनी रंगत स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर व सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयातील शिक्षिका सौ. एस. ए. बागले यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एस. एम. शिंदे आणि श्री. जे. बी. शिंदे यांनी प्रभावीपणे केले. विद्यार्थ्यांना कॉपीमुक्त परीक्षेची शपथ कार्यक्रमाच्या शेवटी इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना कॉपीमुक्त परीक्षेची शपथ देण्यात आली.

# आर. आर. परदेशी शाळेला 20 वर्षांपासून अनुदानापासून वंचित ठेवल्याचा आरोप

## आर्थिक विकास विभागातील कथित गैरप्रकाराची चौकशी करून संबंधितांवर निलंबनाची मागणी

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी :** इंदिरा महिला मंडळ, धुळे संचलित आर. आर. परदेशी प्राथमिक शाळा मागील २० ते २४ वर्षांपासून अनुदानापासून वंचित असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. राजकीय द्वेषातून तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे शाळेवर अन्याय झाल्याचा दावा करण्यात येत असून, या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. शाळेच्या अनुदानाच्या प्रश्नासाठी गेल्या दोन दशकांपासून



सातत्याने पत्रव्यवहार, आंदोलने तसेच विविध स्तरांवर सुनावण्या झाल्याचे सांगण्यात येत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून तपासण्या आणि चौकशी होऊनही अद्याप शाळेला न्याय मिळालेला नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

दरम्यान, महिला आर्थिक विकास विभाग, धुळे यांच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांसाठी तब्बल ८६ हजार ड्रेस शिवण्याचे काम महिला बचत गटांना देण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र, या कामाच्या वाटप प्रक्रियेत गैरप्रकार झाल्याचा आरोप करण्यात आला असून,काही कर्मचाऱ्यांनी संगनमत करून आपल्या कार्यालयाशी संबंधित महिला बचत गटांना हे काम दिल्याचा दावा करण्यात आला आहे. यामध्ये वानखेडे, मिलिंद सोनवणे, माधुरी पाटील, दीपाली भदाणे यांच्यासह अन्य संबंधितांवर आरोप करण्यात आले आहेत. कार्यालयात कार्यरत असलेल्या महिला बचत गटांना या कामाचा लाभ देण्यात आल्याचा आरोप करत या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. शाळेला गेल्या अनेक वर्षांपासून अनुदान न मिळाल्याच्या प्रकरणासह महिला आर्थिक विकास विभागातील ड्रेस शिवणकामाच्या कथित गैरप्रकाराची सखोल चौकशी करण्यात यावी. दोषी आढळणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तातडीने निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच शिक्षण विभागातील या प्रकरणाशी संबंधित सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचीही चौकशी करून दोषी आढळल्यास त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.न्यायाच्या प्रतीक्षेत शाळा सलग २० ते २४ वर्षे अनुदानापासून वंचित राहिलेल्या शाळेच्या प्रश्नाकडे शासन व प्रशासनाने गांभीर्याने पाहावे, अशी मागणी करण्यात आली आहे. सुनावण्या आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या तपासणी अहवालांचा अभ्यास करून जबाबदारी निश्चित करावी.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# नशिराबाद 110 वर्षे जुन्या वाचनालयाचा अनोखा उपक्रम; आठवडे बाजारात भरले ग्रंथप्रेमींचे विश्व!

## मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद; मोबाईलपासून दूर नेत वाचन संस्कृती रुजविण्याचा प्रयत्न

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद। प्रतिनिधी:** येथील ११० वर्षे पुरातन तालुका 'ब' दर्जा वाचनालयाने स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून गावात वाचन संस्कृती रुजविण्यासाठी आणि ती टिकविण्यासाठी स्तुत्य उपक्रम राबविला. वाचनालयाची वाचक संख्या वाढविणे, विद्यार्थी व पालकांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे तसेच दिवसेंदिवस वाढत असलेला मोबाईलचा वापर कमी करून त्यांना पुस्तकांकडे वळविण्याच्या उद्देशाने आठवडे बाजार परिसरात नवनवीन अनमोल ग्रंथांचे प्रदर्शन व वाचक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.या उपक्रमाला नशिराबाद ग्रामस्थांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध शाळांमधील विद्यार्थी, शिक्षक-शिक्षिका, ज्येष्ठ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. प्रदर्शनात विविध विषयांवरील पुस्तके पाहण्याची आणि त्यांची माहिती घेण्याची संधी नागरिकांना मिळाली. मोबाईलच्या वाढत्या वापराला पर्याय म्हणून पुस्तकांची ओळख आजच्या डिजिटल युगात विद्यार्थी आणि पालकांचा मोबाईल फोनकडे वाढता कल चिंतेचा विषय ठरत आहे. या पार्श्वभूमीवर मुलांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी, त्यांची विचारशक्ती आणि ज्ञान वाढावे तसेच पुस्तकांशी नाते दृढ व्हावे, यासाठी वाचनालयाने हा उपक्रम राबविला. नवनवीन आणि विविध विषयांवरील ग्रंथ एकाच ठिकाणी उपलब्ध करून



दिल्याने विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांनी प्रदर्शनाला भेट देत पुस्तकांची माहिती घेतली.

अनेकांनी वाचनालयाचे सभासद होण्याची तयारी दर्शविल्याने या उपक्रमाचा उद्देश मोठ्या प्रमाणात सफल झाल्याचे दिसून आले. मान्यवरांसह ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग ग्रंथ प्रदर्शनाला नगर परिषदेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष योगेशजी पाटील, नगर परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्रजी सोनवणे, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक लालचंद पाटील यांनी भेट देऊन उपक्रमाचे कौतुक केले. याशिवाय विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, शिक्षक-शिक्षिका आणि ज्येष्ठ नागरिकांनीही प्रदर्शनाचा लाभ घेतला. वाचनालयाच्या उपक्रमामुळे गावात वाचन चळवळीला चालना मिळेल आणि नव्या पिढीमध्ये पुस्तकांबद्दल आकर्षण निर्माण होईल, अशी अपेक्षा उपस्थितांकडून व्यक्त करण्यात आली. वाचन संस्कृती जपण्याचा वाचनालयाचा संकल्प ११० वर्षांची समृद्ध परंपरा लाभलेल्या या वाचनालयाने काळानुरूप बदल स्वीकारत वाचनाची चळवळ अधिक व्यापक करण्याचा प्रयत्न सुरू ठेवला आहे. विद्यार्थ्यांसह सर्व वयोगटातील नागरिकांनी नियमितपणे वाचनालयाचा लाभ घ्यावा आणि पुस्तकांशी आपले नाते अधिक दृढ करावे, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. प्रमोद पितांबर आमोदकर, कार्याध्यक्ष जनार्दन शामराव माळी, सेक्रेटरी ॲड. प्रदीप मुरारी देशपांडे, तसेच संचालक मिठाराम शामराव म्हसकर, राजेश्वर सखाराम धर्माधिकारी, जितेंद्र देविदास पाटील, संजय पंडित पाटील, मनोज अरुण नाईक, बी. आर. खंडारे, प्रा. व्ही. बी. कोष्टी, ग्रंथपाल सौ. अनुराधा तारकस आणि सेवक सुधाकर महाजन यांनी परिश्रम घेतले. नशिराबादच्या या ऐतिहासिक वाचनालयाने स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आयोजित केलेले ग्रंथ प्रदर्शन आणि वाचक मेळावा हा 'मोबाईलपासून पुस्तकांकडे' वळण्याचा प्रेरणादायी संदेश देणारा उपक्रम ठरला.

## नशिराबाद वाचनालयात उत्साहात स्वातंत्र्यदिन साजरा

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद | प्रतिनिधी :** देशाच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त नशिराबाद येथील ऐतिहासिक सार्वजनिक वाचनालयात राष्ट्रध्वजारोहणाचा सोहळा उत्साहपूर्ण आणि देशभक्तीमय वातावरणात पार पडला. वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. प्रमोद पितांबर आमोदकर यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकवून मानवंदना देण्यात आली. ध्वजारोहणानंतर उपस्थितांनी राष्ट्रगीताचे सामूहिक गायन करून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. यावेळी वाचनालयाच्या प्रांगणात स्वातंत्र्यदिनाचे महत्त्व आणि देशासाठी बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करण्यात आले. संचालक मंडळाची उपस्थिती कार्यक्रमास वाचनालयाचे कार्याध्यक्ष जनार्दन शामराव माळी आणि सेक्रेटरी प्रदीप मुरारी देशपांडे यांच्यासह संचालक मंडळ उपस्थित होते. यावेळी संचालक मिठाराम शामराव म्हसकर, राजेश्वर सखाराम धर्माधिकारी, जितेंद्र देविदास पाटील, बी. आर. खंडारे, प्रा. व्ही. बी. कोष्टी,



मनोज नाईक आणि संजय पंडित पाटील उपस्थित होते. वाचनालय परिवार व ग्रामस्थांचा सहभाग वाचनालयाच्या ग्रंथपाल सौ. अनुराधा पंकज तारक आणि सेवक सुधाकर महाजन यांच्यासह वाचनालयाचे सभासद व ग्रामस्थ मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित होते. उपस्थितांनी स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा देत देशाच्या प्रगतीसाठी एकजुटीने कार्य करण्याचा संदेश दिला. राष्ट्रगीतानंतर पेढे वाटप ध्वजारोहण आणि राष्ट्रगीतानंतर उपस्थितांना पेढे वाटप करण्यात आले. साधेपणाने मात्र उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमातून वाचनालय परिवाराने राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

## भवरखेडे ग्रामपंचायतीत स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

### देशभक्तीपर कार्यक्रमांनी रंगला सोहळा



जन सम्राट टाईम्स

**भवरखेडे | प्रतिनिधी :** भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त भवरखेडे ग्रामपंचायत कार्यालयाच्या परिसरात देशभक्तीमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात स्वातंत्र्यदिनाचा सोहळा मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला. ग्रामपंचायत, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, माध्यमिक विद्यालय आणि ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रध्वजाला मानवंदना देत सरपंच रेखाबाई विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते ध्वजारोहणाने करण्यात आली. राष्ट्रध्वज फडकताच उपस्थितांनी सामूहिक राष्ट्रगीत गायन करून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. यावेळी ग्रामपंचायत पदाधिकारी व कर्मचारी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शिक्षक व विद्यार्थी, माध्यमिक विद्यालयातील शिक्षक-विद्यार्थी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या देशभक्तीपर सादरीकरणाने रंगत स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर शाळकरी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, भाषणे आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त आणि जोशपूर्ण सादरीकरणाला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. विशेषतः लहान विद्यार्थ्यांच्या निरागस सहभागामुळे कार्यक्रमाला वेगळीच रंगत आली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातून देशप्रेम, राष्ट्रनिष्ठा आणि स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची भावना प्रभावीपणे व्यक्त झाली. कार्यक्रम पाहण्यासाठी उपस्थित ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांना प्रोत्साहन दिले. स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यदिनाचे महत्त्व समजावून सांगितले. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी असंख्य स्वातंत्र्यसैनिकांनी केलेल्या त्याग आणि बलिदानाचे स्मरण करण्यात आले. स्वातंत्र्य हे केवळ उत्सव साजरा करण्यापुरते मर्यादित नसून देशाची एकता, अखंडता, सामाजिक सलोखा आणि संविधानिक मूल्यांचे जतन करण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाची आहे, असा संदेश यावेळी देण्यात आला. ग्रामपंचायत आणि शाळांचा समन्वय ठरला विशेष भवरखेडे ग्रामपंचायतीच्या पुढाकाराने आयोजित या कार्यक्रमात गावातील शाळा आणि ग्रामस्थांचा सहभाग विशेष उल्लेखनीय ठरला. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तसेच माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी आणि शिक्षकांनी कार्यक्रमाच्या नियोजनापासून विविध सादरीकरणांपर्यंत उत्साहाने सहभाग घेतला.

## सन १९९९ बॅचकडून महात्मा फुले हायस्कूलला ५० इंची स्मार्ट टीव्ही भेट

### माजी विद्यार्थ्यांच्या पुढाकारातून डिजिटल शिक्षणाला बळ

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव। प्रतिनिधी:** धरणगाव शहरातील सुवर्ण महोत्सवी महात्मा फुले हायस्कूलला सन १९९९ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांच्या वतीने ५० इंची TCL स्मार्ट टीव्ही भेट देण्यात आला. ८० व्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून माजी विद्यार्थ्यांनी शाळेच्या डिजिटल शिक्षणाला हातभार लावत हा उपक्रम राबविला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक जे. एस. पवार यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सावता माळी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर महाजन होते. प्रमुख अतिथी म्हणून संचालक मोतीलाल महाजन, गोपाल महाजन, माजी मुख्याध्यापक एस. डब्ल्यू. पाटील, पत्रकार धर्मराज मोरे, ह. भ. प. हिरालाल महाराज, सिताराम महाजन, केदार मॅडम, शुभम महाजन यांच्यासह सन १९९९ बॅचचे माजी विद्यार्थी उपस्थित होते. 'आपली शाळा–सुंदर शाळा' उपक्रमाला माजी विद्यार्थ्यांचा हातभार सन १९९९ बॅचचे माजी विद्यार्थी दीपक वाघ, नरेंद्र बडगुजर आणि



नितेश माळी यांनी मनोगत व्यक्त करताना शाळेतील आजी-माजी शिक्षकांचे कार्य आपल्या जीवनासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. शाळेत विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबविले जात असल्याचा अभिमान असल्याचे त्यांनी नमूद केले. 'आपली शाळा–सुंदर शाळा' या संकल्पनेअंतर्गत शाळेला डिजिटल शिक्षणाच्या दिशेने पुढे नेण्यासाठी माजी विद्यार्थ्यांनी हा छोटासा प्रयत्न केल्याचे नरेंद्र बडगुजर यांनी सांगितले. भविष्यातही शाळेच्या गरजेनुसार मदत करण्यासाठी माजी विद्यार्थी सदैव तत्पर राहतील, अशी ग्वाही दीपक वाघ यांनी दिली. स्मार्ट टीव्हीमुळे डिजिटल शिक्षणाला चालना माजी विद्यार्थी नितेश माळी यांनी स्मार्ट टीव्ही संगणक कक्षात तातडीने इन्स्टॉल करून कार्यान्वित केला. यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक व्हिडिओ, डिजिटल अध्ययन साहित्य आणि विविध शैक्षणिक उपक्रमांचा प्रभावीपणे उपयोग करता येणार आहे. मुख्याध्यापक जे. एस. पवार यांनी सन १९९९ बॅचच्या सर्व माजी विद्यार्थ्यांचे आभार व्यक्त करताना, विद्यार्थ्यांना डिजिटल पद्धतीने शिक्षण देण्यासाठी स्मार्ट टीव्ही अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे सांगितले. 'आमचे विद्यार्थी–आमचा अभिमान' कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर महाजन यांनी 'आमचे विद्यार्थी–आमचा अभिमान' या शब्दांत सन १९९९ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. शाळेने दिलेले संस्कार आणि शिक्षणाची जाणीव ठेवून माजी विद्यार्थ्यांनी शाळेच्या विकासासाठी पुढाकार घेणे ही अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

## बोरअजंटी आश्रमशाळेत तिरंग्याच्या साक्षीने देशभक्तीचा जल्लोष!

### देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रमांनी रंगला स्वातंत्र्यदिन

जन सम्राट टाईम्स

**बोरअजंटी। (प्रतिनिधी):** चोपडा येथील धनाजी नाना चौधरी आदिवासी सेवा मंडळ, सत्रासेन संचलित अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेत भारताचा ८०वा स्वातंत्र्यदिन देशभक्ती, राष्ट्रप्रेम, शिस्त आणि उत्साहाच्या वातावरणात दिमाखात साजरा करण्यात आला. तिरंग्याच्या साक्षीने झालेल्या ध्वजारोहणापासून विद्यार्थ्यांच्या आकर्षक कवायती, देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रम, विविध स्पर्धा, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव आणि पालक मेळाव्यापर्यंत संपूर्ण परिसर स्वातंत्र्यदिनाच्या उत्साहाने भारावून गेला. विद्यार्थ्यांच्या मनात देशप्रेम, राष्ट्रनिष्ठा, स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाची जाणीव, सामाजिक बांधिलकी आणि शिक्षणातून राष्ट्रनिर्मितीची भावना रुजावी, या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सहाय्यक प्रकल्प अधिकारी मिनाक्षी सुलताने यांच्या हस्ते ध्वजारोहण कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या तथा यावल येथील सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) श्रीमती मिनाक्षी सुलताने यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. तिरंगा अभिमानाने फडकताच उपस्थितांनी राष्ट्रगीताचे सामूहिक गायन करून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रविंद्र रायसिंग भादले, उपाध्यक्ष धनंजय रायसिंग भादले आणि सचिव नानासाहेब ज्ञानेश्वर रायसिंग भादले यांनी विद्यार्थी, पालक, शिक्षक, कर्मचारी व ग्रामस्थांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. शिस्तबद्ध कवायतीतून विद्यार्थ्यांनी दाखविली राष्ट्रभक्ती स्वातंत्र्यदिनानिमित्त विद्यार्थ्यांची आकर्षक व शिस्तबद्ध कवायत घेण्यात आली. गणवेशातील विद्यार्थ्यांनी एकसारख्या हालचाली आणि शिस्तबद्ध संचलनातून संघभावना, आत्मविश्वास व शिस्तीचे दर्शन घडविले. विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाला उपस्थित मान्यवर, पालक आणि ग्रामस्थांनी उत्स्फूर्त दाद दिली. तंबाखूमुक्ती व कॉपीमुक्त परीक्षेची शपथ कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना तंबाखूमुक्तीची शपथ देण्यात आली. स्वतः व्यसनांपासून दूर राहण्याबरोबरच कुटुंब आणि समाजात व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचविण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला. तसेच कॉपीमुक्त परीक्षेची शपथ देत विद्यार्थ्यांनी कोणत्याही गैरप्रकाराचा अवलंब न करता स्वतःच्या ज्ञान, मेहनत आणि प्रामाणिकपणाच्या बळावर यश मिळविण्याचा निर्धार केला. देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रमांनी रंगली शाळा विद्यार्थ्यांसाठी देशभक्तीपर गीत, भाषणे, सांस्कृतिक कार्यक्रम, वक्तृत्व आणि निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. भारतीय स्वातंत्र्यलढा, स्वातंत्र्यसैनिकांचे बलिदान, भारतीय संविधान, देशभक्ती, राष्ट्रनिर्मिती, सामाजिक जबाबदारी आणि शिक्षणाचे महत्त्व या विषयांवर विद्यार्थ्यांनी प्रभावी विचार मांडले. गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव मागील शैक्षणिक वर्षात विविध शैक्षणिक परीक्षा, क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि शालेय उपक्रमांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या सन्मानामुळे विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी प्रेरणा मिळाली.

## पत्रकार संघाच्या पाचोरा तालुका कार्याध्यक्षपदी कोळी

जन सम्राट टाईम्स

**पाचोरा। प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या पाचोरा तालुका कार्याध्यक्षपदी पत्रकार संदिप कोळी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पत्रकारिता क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेत संघटनेने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष निलेश सोमाणी, राज्य संघटक संजय भोकरे, प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे तसेच राज्य उपाध्यक्ष किशोर



रायसाकडा यांच्या सूचनेनुसार खान्देश विभागीय अध्यक्ष भुवनेश दुसाने यांनी संदिप कोळी यांची पाचोरा तालुका कार्याध्यक्षपदी नियुक्ती जाहीर केली.

यावेळी विभागीय उपाध्यक्ष राकेश सुतार, पाचोरा तालुका अध्यक्ष गौतम सोनवणे, तसेच विनोद तावडे, स्वप्नील कुमावत, गजानन पाटील, निलेश पाटील, संदिप चव्हाण, छोटू सोनवणे आणि गुरुदास भालेराव यांनी संदिप कोळी यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

पत्रकारांच्या प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडण्याची अपेक्षा संदिप कोळी यांच्या नियुक्तीबद्दल पत्रकारिता क्षेत्रातील विविध मान्यवर, पत्रकार बांधव आणि मित्रपरिवाराकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. त्यांच्या कार्यकाळात पत्रकारांच्या विविध प्रश्नांना व समस्यांना संघटितपणे वाचा फोडून पत्रकारांच्या हक्कांसाठी प्रभावीपणे पाठपुरावा केला जाईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. नवीन जबाबदारीच्या माध्यमातून पत्रकार संघटनेचे कार्य अधिक व्यापक करण्यासाठी आणि पत्रकारांच्या अडचणी सोडविण्यासाठी संदिप कोळी सक्रिय भूमिका बजावतील, असा विश्वास पत्रकार बांधवांनी व्यक्त केला.

## बोरगाव खुर्द ग्रामपंचायतीत अनोख्या पद्धतीने स्वातंत्र्यदिन साजरा

### परिसरात खळबळ कृपाणाने हल्ल्याचा प्रयत्न

जन सम्राट टाईम्स

**बोरगाव खुर्द | प्रतिनिधी:** स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून बोरगाव खुर्द ग्रामपंचायतीने सामाजिक समता आणि श्रमप्रतिष्ठेचा संदेश देत यंदाचा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा केला. ग्रामपंचायत कार्यालयात नेहमीप्रमाणे लोकप्रतिनिधी किंवा वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या हस्ते ध्वजारोहण न करता सार्वजनिक वाचनालयाच्या ग्रंथपाल भारती विजय पाटील आणि माजी सैनिक शुभम प्रकाश पाटील यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकविण्यात आला. तसेच जिल्हा परिषद शाळा, बोरगाव खुर्द येथे ग्रामपंचायत सदस्य नंदू पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या उपक्रमातून समाजातील विविध घटकांना सन्मान देण्याचा आणि राष्ट्रध्वज फडकविण्याचा मान सर्वांना मिळावा, असा प्रेरणादायी संदेश देण्यात आला. ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. अर्चना दिनकर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पोलीस पाटील लखिचंद्र भगवान पाटील, निलेश पाटील, नंदू पाटील, दिनकर पाटील, राहुल पाटील आणि मुकेश पाटील यांच्या उपस्थितीत हा सोहळा उत्साहपूर्ण व देशभक्तीमय वातावरणात पार पडला विद्यार्थ्यांची भव्य प्रभात फेरी ध्वजारोहणानंतर विद्यार्थ्यांनी संपूर्ण गावातून भव्य प्रभात फेरी काढली. हातात तिरंगा घेऊन विद्यार्थ्यांनी 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्' अशा देशभक्तीपर घोषणा देत गावातील वातावरण राष्ट्रप्रेमाने भारावून टाकले. प्रभात फेरीदरम्यान विद्यार्थ्यांचा उत्साह आणि देशभक्ती पाहून ग्रामस्थांनी त्यांचे कौतुक केले. विविध ठिकाणी नागरिकांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. राष्ट्रध्वजाला मानवंदना ध्वजस्तंभाच्या ठिकाणी पारंपरिक पद्धतीने पूजा करून नारळ वाढविण्यात आला. त्यानंतर पुष्पवृष्टी करत राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. उपस्थितांनी राष्ट्रगीत गायन करून तिरंग्याला सलामी दिली. ग्रामपंचायतीने स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने राबविलेल्या या उपक्रमामुळे बोरगाव खुर्द गावात आनंद, अभिमान आणि देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले होते. विशेषतः ग्रंथपाल आणि माजी सैनिक यांच्या हस्ते ध्वजारोहण करून सामाजिक सन्मानाची जपणूक केल्याबद्दल ग्रामस्थांकडून ग्रामपंचायतीचे कौतुक करण्यात आले.

समतेचा प्रेरणादायी संदेश स्वातंत्र्यदिन हा केवळ ध्वजारोहणाचा दिवस नसून समाजातील प्रत्येक घटकाच्या योगदानाचा सन्मान करण्याचा दिवस आहे, हा संदेश बोरगाव खुर्द ग्रामपंचायतीच्या उपक्रमातून अधोरेखित झाला. वाचन संस्कृती जोपासणाऱ्या ग्रंथपालासह देशसेवेत योगदान देणाऱ्या माजी सैनिकाला ध्वजारोहणाचा मान देत ग्रामपंचायतीने सामाजिक समतेचा आणि राष्ट्रसेवेचा आदर्श निर्माण केला.

## महात्मा फुले हायस्कूलमध्ये स्वातंत्र्यदिन व बक्षीस वितरण सोहळा उत्साहात

### एसएससीत प्रथम आलेल्या वैभव माळीच्या हस्ते ध्वजारोहण; गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव | प्रतिनिधी :** धरणगाव शहरातील सुवर्ण महोत्सवी महात्मा फुले हायस्कूलमध्ये ८० वा स्वातंत्र्यदिन व बक्षीस वितरण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. एसएससी बोर्डाच्या परीक्षेत शाळेतून प्रथम क्रमांक मिळविणारा विद्यार्थी वैभव राकेश माळी याच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक जे. एस. पवार यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सावता माळी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर महाजन होते. प्रमुख अतिथी म्हणून संचालक मोतीलाल महाजन, गोपाल महाजन, माजी मुख्याध्यापक एस. डब्ल्यू. पाटील, पत्रकार धर्मराज मोरे, ह. भ. प. हिरालाल महाराज, सिताराम महाजन, केदार मॅडम, शुभम महाजन यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. तसेच १९९९ बॅचचे माजी विद्यार्थी, शाळेचे माजी विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थितांनी तंबाखूमुक्तीची सार्वजनिक शपथ घेतली. त्यानंतर क्रीडा शिक्षक एच. डी. माळी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी कवायत संचलन सादर केले. मान्यवरांच्या हस्ते इयत्ता पहिली ते नववी तसेच एसएससी बोर्डाच्या परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. मागासवर्गीय विद्यार्थ्यांमधून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांनाही बक्षिसे देण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक साहित्य, कपडे तसेच महापुरुषांचे अनमोल ग्रंथ देऊन प्रोत्साहित करण्यात आले. विश्वस्त मोतीलाल महाजन, दीपक वाघ आणि नरेंद्र बडगुजर यांनी मनोगत व्यक्त करताना शाळेतील विविध उपक्रमांचे कौतुक केले. शाळेतील उपशिक्षक पी. डी. पाटील व एम. बी. मोरे यांना नगरपालिकेकडून 'उत्कृष्ट बीएलओ पुरस्कार' मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष व मुख्याध्यापक यांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात संस्थाध्यक्ष ज्ञानेश्वर महाजन यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करून, विद्यार्थ्यांनी सातत्याने अभ्यास करून जीवनात मोठे यश संपादन करावे आणि आपल्या कर्तृत्वातून शाळेचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी दिनेश शेठ लोहार यांच्या वतीने विद्यार्थ्यांना चॉकलेटचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख एस. एन. कोळी व पी. डी. पाटील यांनी केले, तर आभार व्ही. टी. माळी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# पाचोऱ्यात केंद्रस्तरीय 'स्पेलिंग बी' सराव स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद जिल्हा परिषद शाळांमध्ये इंग्रजी विषयावर विशेष भर!

## स्पर्धेत पाचोरा तालुक्यातील सुमारे १४५ जिल्हा परिषद शाळांनी नोंदविला सहभाग

जन सम्राट टाईम्स

**पाचोरा | प्रतिनिधी :** ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांचे इंग्रजी विषयातील वाचन, आकलन आणि शब्दलेखन कौशल्य विकसित करण्याच्या उद्देशाने पाचोरा पंचायत समितीच्या शिक्षण विभागामार्फत केंद्रस्तरीय 'स्पेलिंग बी' सराव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. गट विकास अधिकारी के. बी. अंजने आणि प्राथमिक शिक्षणाधिकारी निलेश पाटील यांच्या प्रेरणेने हा उपक्रम राबविण्यात आला. गटशिक्षणाधिकारी विजय पवार, शालेय पोषण आहार अधीक्षक सरोज गायकवाड आणि गट समन्वयक जितेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली १० ऑगस्ट २०२६ रोजी शाळास्तरावर स्पेलिंग बी सराव स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत पाचोरा तालुक्यातील सुमारे १४५ जिल्हा परिषद शाळांनी सहभाग नोंदविला. १४ केंद्रांवर ५६० विद्यार्थ्यांचा सहभाग शाळास्तरावर निवड झालेल्या विद्यार्थ्यांसाठी ११ ऑगस्ट २०२६ रोजी केंद्रस्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. तालुक्यातील १४ केंद्रांवर झालेल्या या उपक्रमात सुमारे ५६० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांची स्पर्धा एकूण चार गटांमध्ये घेण्यात आली. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेतील शब्दसंग्रह वाढविण्यासोबतच अचूक शब्दलेखन, वाचन आणि आकलन



कौशल्य विकसित करण्यास मदत होणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी विषयाबद्दल आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरत असल्याचे गटशिक्षणाधिकारी विजय पवार यांनी सांगितले. शिक्षकांच्या परिश्रमातून उपक्रम यशस्वी स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष शिक्षिका प्रज्ञा आराध्ये, केंद्रप्रमुख अनिल पाटील, सखाराम महाजन, संदीप पवार, शांताराम वानखेडे, जितेंद्र पाटील, राजेश सोनवणे, रामदास जाधव, रामराव पाटील, संजय काळे, जावेद शेख, विशाल पवार, ज्ञानेश्वर पाचोळे, अनिल वराडे, चंद्रकांत मोराणकर, सुनील शिवदे, गिरीश भोयर, कैलास बडगुजर तसेच सर्व विशेष शिक्षकांनी परिश्रम घेतले. अशी रंगते 'स्पेलिंग बी' स्पर्धा स्पर्धेदरम्यान प्रत्येक गटातील विद्यार्थ्यांना रांगेत उभे केले जाते. त्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याला एक इंग्रजी शब्द सांगून त्याचे अचूक स्पेलिंग सांगण्यास सांगितले जाते. विद्यार्थ्यांची स्पर्धा एकूण चार गटांमध्ये घेण्यात आली. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेतील शब्दसंग्रह वाढविण्यासोबतच अचूक शब्दलेखन, वाचन आणि आकलन कौशल्य विकसित करण्यास मदत होणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी विषयाबद्दल आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरत असल्याचे गटशिक्षणाधिकारी विजय पवार यांनी सांगितले.चुकीचे स्पेलिंग सांगणारा विद्यार्थी स्पर्धेतून बाद होतो. अशा पद्धतीने स्पर्धा पुढे सुरू राहते आणि शेवटपर्यंत अचूक स्पेलिंग सांगत टिकून राहिलेला विद्यार्थी विजेता ठरतो. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी भाषेची गोडी निर्माण करण्यासोबतच त्यांचा आत्मविश्वास वाढविणाऱ्या या उपक्रमाचे पालक व शिक्षण क्षेत्रातून कौतुक होत आहे.

### १४ केंद्रांवर ५६० विद्यार्थ्यांचा सहभाग

परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांचे इंग्रजी विषयातील वाचन, आकलन आणि शब्दलेखन कौशल्य विकसित करण्याच्या उद्देशाने पाचोरा पंचायत समितीच्या शिक्षण विभागामार्फत केंद्रस्तरीय 'स्पेलिंग बी' सराव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. गट विकास अधिकारी के. बी. अंजने आणि प्राथमिक शिक्षणाधिकारी निलेश पाटील यांच्या प्रेरणेने हा उपक्रम राबविण्यात आला. गटशिक्षणाधिकारी विजय पवार, शालेय पोषण आहार अधीक्षक सरोज गायकवाड आणि गट समन्वयक जितेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली १० ऑगस्ट २०२६ रोजी शाळास्तरावर स्पेलिंग बी सराव स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत पाचोरा तालुक्यातील सुमारे १४५ जिल्हा परिषद शाळांनी सहभाग नोंदविला. १४ केंद्रांवर ५६० विद्यार्थ्यांचा सहभाग शाळास्तरावर निवड झालेल्या विद्यार्थ्यांसाठी ११ ऑगस्ट २०२६ रोजी केंद्रस्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

---

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

# रेल्वेने बंद केलेला शेतरस्ता पूर्ववत करा!

## शेती साहित्य वाहतुकीत अडचणी



जन सम्राट टाईम्स

**पाचोरा | प्रतिनिधी:** तालुक्यातील तारखेडा बु. येथील रेल्वे विभागाने बंद केलेला शेतरस्ता तातडीने पूर्ववत सुरू करावा, या मागणीसाठी ग्रामस्थ व शेतकरी बांधवांनी पाचोरा-भडगाव मतदारसंघाचे आमदार किशोर आप्पा पाटील यांना निवेदन दिले. ग्रामस्थांच्या निवेदनानुसार, गावापासून नामदेव झिपरू बागुल यांच्या शेतापर्यंत पूर्वीपासून वापरात असलेला शेतरस्ता रेल्वे विभागाने सुमारे दोन महिन्यांपूर्वी बंद केला आहे. रेल्वे पोल क्रमांक ३६५/१ ते ३६५/१५ दरम्यानचा हा मार्ग परिसरातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा असून, दैनंदिन शेती कामांसाठी त्याचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात होता. २०० हेक्टरपर्यंत शेतीवर परिणाम होण्याची शक्यता शेतरस्ता बंद झाल्याने परिसरातील सुमारे १०० ते २०० हेक्टर शेती प्रभावित होण्याची शक्यता आहे. खते, बी-बियाणे, कीटकनाशके, औषधे तसेच शेतीची अवजारे शेतापर्यंत पोहोचविताना शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेकदा शेती साहित्य डोक्यावरून किंवा पर्यायी मार्गाने वाहून न्यावे लागत असल्याने शेतीचा खर्च आणि श्रम दोन्ही वाढले आहेत. आपत्कालीन परिस्थितीत जीविताचा धोका शेतात काम करताना सर्पदंश, अपघात किंवा अन्य वैद्यकीय आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास रुग्णाला तातडीने रुग्णालयात नेणे कठीण होण्याची शक्यता ग्रामस्थांनी निवेदनातून व्यक्त केली आहे. त्यामुळे हा प्रश्न केवळ शेतीपुरता मर्यादित नसून शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेशी आणि जीविताशी संबंधित असल्याचे ग्रामस्थांनी म्हटले आहे. १५० शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून या मार्गावर अवलंबून असलेले सुमारे १०० ते १५० शेतकरी शेतीच्या उत्पन्नावर आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. शेतरस्ता कायमस्वरूपी बंद राहिल्यास शेती करणे आर्थिकदृष्ट्या कठीण होऊन शेतकऱ्यांवर कर्जाचा बोजा वाढण्याची भीतीही ग्रामस्थांनी व्यक्त केली. रेल्वे अधिकाऱ्यांशी चर्चा करून तोडगा काढण्याची मागणी या गंभीर प्रश्नाची तातडीने दखल घेऊन आमदार किशोर आप्पा पाटील यांनी संबंधित रेल्वे अधिकाऱ्यांशी चर्चा करावी, प्रत्यक्ष स्थळाची पाहणी करावी आणि बंद करण्यात आलेला शेतरस्ता पूर्ववत सुरू करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी आर. आर. पाटील, धनराज पाटील, शांताराम जाधव, बापू पहिलवान, पंकज पाटील, बापू पाटील, दिनेश मोरे, मधुकर पाटील, सुधाकर पाटील, सनी पाटील, रोहिदास पाटील यांच्यासह परिसरातील शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# स्वातंत्र्यदिनानिमित्त रेडक्रॉस सोसायटी व मुक्ती फाउंडेशनचा सेवाभावी उपक्रम

## शहीद हुतात्म्यांना मुकुंद गोसावी यांची रक्तदानाने आदरांजली

जन सम्राट टाईम्स

**जळगाव। प्रतिनिधी:** स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून इंडियन रेडक्रॉस सोसायटी आणि मुक्ती फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अमर शहीद हुतात्म्यांना रक्तदानाच्या माध्यमातून अनोखी आदरांजली अर्पण करण्यात आली. या प्रेरणादायी उपक्रमात दिव्यांग विक्रमी रक्तदाते मुकुंद गोसावी यांनी आपल्या शारीरिक अडचणींवर मात करत स्वयंस्फूर्तीने रक्तदान केले आणि देशासाठी बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांना विनम्र अभिवादन केले. १५ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान उपक्रमाचा उद्देश गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध करून देणे हा होता. विशेषतः थॅलेसिमिया, हिमोफिलिया, सिकलसेल, रक्तक्षय तसेच गंभीर आजारांनी त्रस्त रुग्णांसाठी नियमित रक्तसाठा उपलब्ध राहावा, यासाठी रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. रक्तदानातून हुतात्म्यांना अनोखी मानवंदना भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी असंख्य वीरांनी आपल्या प्राणांचे



बलिदान दिले. त्यांच्या त्यागाची आठवण ठेवत रक्तदान करून त्यांना आदरांजली वाहण्याचा उपक्रम राबविण्यात आला. 'रक्तदान म्हणजे जीवनदान' या भावनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला रक्तदाते आणि सेवाभावी कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मान्यवरांची उपस्थिती या प्रसंगी रेडक्रॉसचे पदसिद्ध अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी रोहनजी घुगे (आयएएस), चेअरमन मंगला ठोंबरे, रक्तकेंद्र चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार जैन, उपाध्यक्ष गनीभाई मेमन, डॉ. शशिकांत गाजरे, हेमंत जकातदार, डॉ. उल्हास तासखेडकर, अनिल भोळे यांच्यासह विविध मान्यवर व रक्तदाते उपस्थित होते. या उपक्रमासाठी जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे एस. पी. गणेशकर, सीए हितेश आगीवाल, गणेश पाटील, अक्षय महाजन, सतीशकुमार महाजन, हर्षद भारती, अजय देशमुख, गोपाल वालेच्या, अविनाश पाटील, रणजीत गव्हाळे, डॉ. मेहुल कुमार, वैभव निकुंभ आदींनी सहकार्य केले. वर्षभर रक्तदान करण्याचे आवाहन शहरासह जिल्ह्यातील सामाजिक सेवाभावी संस्था, प्रतिष्ठाने, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी हुतात्म्यांच्या त्यागाची आठवण ठेवून वर्षभर रक्तदान सेवेत सहभागी व्हावे, तसेच रक्तदानाच्या पवित्र कार्यातून गंभीर व गरजू रुग्णांना जीवनदान द्यावे, असे आवाहन विक्रमी रक्तदाते मुकुंद गोसावी यांनी केले.

---

# सफाई कर्मचाऱ्याच्या हस्ते राष्ट्रध्वजारोहण!

## कासारखेडा ग्रामपंचायतीने जपली श्रमप्रतिष्ठा

जन सम्राट टाईम्स

**कासारखेडा | प्रतिनिधी :** स्वातंत्र्यदिनानिमित्त कासारखेडा ग्रामपंचायतीने सामाजिक समता आणि श्रमप्रतिष्ठेचा आदर्श निर्माण करणारा अनोखा उपक्रम राबविला. ग्रामपंचायतीच्या वतीने यंदा राष्ट्रध्वजारोहणाचा मान लोकप्रतिनिधी किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांना न देता गाव स्वच्छ ठेवण्यासाठी अहोरात्र सेवा बजावणारे सफाई कर्मचारी श्री. बळीराम सिताराम अढायगे यांना देण्यात आला. त्यांच्या हस्ते राष्ट्रध्वजारोहण झाल्याने या उपक्रमाचे ग्रामस्थांकडून कौतुक करण्यात आले. ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. अनिता मुराद तडवी व उपसरपंच सौ. अश्विनी रामप्रसाद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा स्वातंत्र्यदिन सोहळा उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला. ध्वजारोहणावेळी पारंपरिक पद्धतीने पूजा, नारळ वाढविणे व पुष्पवृष्टी करून राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. गाव स्वच्छ ठेवणाऱ्या हातांना राष्ट्रध्वज फडकविण्याचा मान कासारखेडा गावाची स्वच्छता



राखण्यासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या बळीराम अढायगे यांच्या योगदानाची दखल घेत ग्रामपंचायतीने त्यांना ध्वजारोहणाचा मान दिला.

पांढरा शुभ्र पोशाख व गांधी टोपी परिधान करून त्यांनी राष्ट्रध्वज फडकविला आणि राष्ट्रध्वजाला सलामी दिली.ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. अनिता मुराद तडवी व उपसरपंच सौ. अश्विनी रामप्रसाद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा स्वातंत्र्यदिन सोहळा उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला. या प्रसंगामुळे उपस्थित ग्रामस्थांमध्ये अभिमानाची भावना निर्माण झाली. विद्यार्थ्यांची भव्य प्रभातफेरी; देशभक्तीपर घोषणांनी गाव दुमदुमले ध्वजारोहणानंतर मनुदेवी माध्यमिक विद्यालय व जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी गावातून भव्य प्रभातफेरी काढली. हातात तिरंगा घेऊन विद्यार्थ्यांनी 'भारत माता की जय' यांसह देशभक्तीपर घोषणा दिल्या. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण कासारखेडा परिसर देशभक्तीच्या वातावरणाने भारावून गेला.

या कार्यक्रमास ग्रामसेवक भरत पाटील, पोलीस पाटील प्रवीण पाटील, कृषी सहाय्यक विनोद शिंदे, ग्रामपंचायत कर्मचारी रवींद्र न्हावी, धनंजय पाटील, वसीम तडवी, शिक्षकवृंद, विद्यार्थी, ग्रामपंचायत सदस्य, महिला मंडळ तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. 'गाव स्वच्छ ठेवणाऱ्या हातांना राष्ट्रध्वज फडकविण्याचा सन्मान' देत कासारखेडा ग्रामपंचायतीने श्रमाला प्रतिष्ठा आणि समानतेचा संदेश दिला. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने राबविलेला हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे आणि कष्टकरी वर्गाच्या सन्मानाचे प्रेरणादायी उदाहरण ठरला.

---

# डोंगराळे येथे न्यू इंग्लिश स्कूल व शिंदे हायस्कूलमध्ये उत्साहात स्वातंत्र्यदिन साजरा

## ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत व देशभक्तीपर कार्यक्रम; स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन

जन सम्राट टाईम्स

**डोंगराळे | प्रतिनिधी:** डोंगराळे येथील न्यू इंग्लिश स्कूल आणि शिंदे हायस्कूल येथे भारतीय स्वातंत्र्यदिन उत्साहपूर्ण आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक गढरी सर, शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वातंत्र्यदिनानिमित्त प्रकाशदादा ह्याळीज यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.
यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच विष्णू आप्पा ह्याळीज उपस्थित होते. तसेच परबत खैरनार, भाईदास पाटील, राजू परदेशी, भाऊसाहेब पाटील, सुधीर पाटील, पप्पू खैरनार आणि संजय ह्याळीज यांची प्रमुख



उपस्थिती होती. ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीताचे सामूहिक गायन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास आणि स्वातंत्र्यदिनाचे महत्त्व सांगण्यात आले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांचे बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांना यावेळी अभिवादन करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रम उत्साहात, शिस्तबद्ध आणि देशभक्तीमय वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक गढरी सर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास पालक, ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# उमेद अभियानातील कथित भ्रष्टाचाराविरोधात महिला आक्रमक

## सहा दिवसांपासून सुरू असलेल्या आंदोलनाकडे दुर्लक्षाचा आरोप; बचत गटांच्या महिलांची घोषणाबाजी

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी:** महाराष्ट्र शासनाच्या उमेद व मानव विकास अभियानातील कथित गैरव्यवहाराविरोधात बचत गटांच्या महिला आक्रमक झाल्या असून, भ्रष्टाचाराच्या आरोपांची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी महिलांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) यांच्या दालनाबाहेर बेशरमची फुले हातात घेऊन ठिय्या आंदोलन केले. यावेळी महिलांनी कथित भ्रष्ट कारभार करणाऱ्या अधिकाऱ्यांसह जिल्हा परिषदेच्या प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. त्यामुळे जिल्हा परिषद परिसरात काही काळ



वातावरण चांगलेच तापले होते. आंदोलनकर्त्या महिलांनी सीईओ यांना निवेदन देऊन आपल्या मागण्यांवर चर्चा केली. मशीन वाटपात गैरव्यवहाराचा आरोप उमेद व मानव विकास अभियानाच्या माध्यमातून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी विविध प्रकारच्या मशीनचे वाटप करण्यात आले होते. मात्र, कालांतराने अनेक मशीन बंद पडल्याने संबंधित बचत गटांच्या महिलांचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. मशीन खरेदी प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत बचत गटांच्या महिलांनी यापूर्वीही प्रशासनाकडे अनेक वेळा निवेदने दिली होती. मात्र, वारंवार पाठपुरावा करूनही प्रश्न सुटत नसल्याने संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून कारवाई करावी, या मागणीसाठी महिलांनी बिराड आंदोलन सुरू केले. सहा दिवसांपासून आंदोलन; प्रशासनाच्या भूमिकेवर नाराजी गेल्या सहा दिवसांपासून बिराड आंदोलन सुरू असतानाही प्रशासनाने दखल घेतली नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. त्यामुळे संतप्त झालेल्या महिलांनी आंदोलनाची तीव्रता वाढवत थेट जिल्हा परिषद सीईओंच्या दालनाबाहेर ठिय्या आंदोलन केले. हातात बेशरमची फुले घेऊन महिलांनी प्रशासनाचा निषेध केला. उमेद अभियानातील मशीन खरेदी प्रक्रियेतील कथित गैरव्यवहाराची निष्पक्ष चौकशी करावी, दोषी आढळणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी आणि बचत गटांच्या महिलांचे नुकसान भरून काढण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. महिला आंदोलनाच्या भूमिकेवर ठाम या आंदोलनात सामाजिक कार्यकर्ते बापू बागुल यांच्यासह भारती माळी, रेखाबाई पाटील, संगीता पाटील, मनिषा पाटील, सरलाबाई पाटील, सरला महाले, निर्मला महाले, ज्योती साळुंखे, सुरेखा साळुंखे आणि संगीता साळुंखे यांच्यासह बचत गटांच्या महिला सहभागी झाल्या. उमेद अभियानाचा उद्देश महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे असताना, मशीन खरेदीतील कथित गैरव्यवहारामुळे महिलांचेच नुकसान होत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. त्यामुळे प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन चौकशी व योग्य कार्यवाही करावी, अशी मागणी महिलांनी केली आहे.

---

# साळवा फाट्यावर दुचाकींची समोरासमोर धडक

जन सम्राट टाईम्स

**रोटवद । प्रतिनिधी:** चोपडा–धरणगाव मार्गावरील साळवा फाटा येथे दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन अपघात झाल्याची घटना घडली. या मार्गावर आवश्यक ठिकाणी गतिरोधक (ब्रेकर) नसल्याने वाहनांचा वेग नियंत्रित होत नसून, त्यामुळे अपघाताचा धोका वाढल्याची चिंता परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली आहे. वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा फाटा साळवा फाटा हा वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा असून, या मार्गावरून दिवसभर मोठ्या प्रमाणात वाहनांची ये-जा सुरू असते. मात्र, वाहनांचा वेग नियंत्रित करण्यासाठी आवश्यक ठिकाणी गतिरोधक तसेच योग्य सूचना फलक नसल्याने वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः फाट्यावर वाहनांची वर्दळ वाढत असताना वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना नसल्याने अपघातांची शक्यता वाढत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी संबंधित प्रशासनाने साळवा फाट्याची तातडीने पाहणी करून आवश्यक त्या ठिकाणी गतिरोधक बसवावेत, तसेच वाहनचालकांना पूर्वसूचना मिळण्यासाठी योग्य सूचना फलक लावावेत, अशी मागणी केली आहे. चोपडा–धरणगाव मार्गावरील वाहतूक सुरक्षेचा प्रश्न गांभीर्याने घेऊन अपघातांची पुनरावृत्ती होण्यापूर्वी आवश्यक त्या उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे नागरिकांनी सांगितले. गतिरोधक, दिशादर्शक व सावधानतेचे फलक तसेच इतर सुरक्षात्मक उपाय तातडीने करण्यात यावेत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.